दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम
रविवार पुरवणी ७ एप्रिल २०२४

# सोनम वांगडूंचे उपोषण: न्याय आणि मानवी हक्कांसाठी आवाहन

संपादकीय

लडाखला विशेष दर्जा आणि राज्याचा दर्जा मिळावा या मागणीसाठी उपोषणाला बसलेल्या इनोव्हेटर आणि लडाखी मॅगसेसे पुरस्कारप्राप्त सोनम वांगचुक यांनी मंगळवारी की, लडाखवासियांना आता हे लडाख जुन्या काळातील वसाहतीसारखे वाटते आणि दूरदूरचे अधिकारी राज्यकारभारासाठी येत आहेत आणि आपली मनमानी करत आहेत असे सांगितले. लडाखमध्ये विकेंद्रित लोकशाही सरकार स्थापन होणे आणि त्याच्यामार्फत योग्य शाश्वत आणि पर्यावरणास अनुकूल विकास साधने, संविधानाच्या परीक्षेत्रात लडाखला राज्याचा दर्जा देणे आणि सहावी अनुसूची अंतर्गत केंद्रशासित प्रदेशाचा विशेष दर्जा मिळावा या तीन प्रमुख मागण्यासाठी हे उपोषण सुरू केले आहे . गोठवणाऱ्या तापमानात 21 दिवसांचा उपवास करण्याचे धाडस सोनम वांगचुक यांनी दाखविले.

57 वर्षीय सोनम वांगचुक एक अभियंता, नवोदित आणि शिक्षण सुधारणावादी आहेत. 1988 मध्ये स्थापन झालेल्या लडाखच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक चळवळीचे ते संस्थापक-संचालक आहेत. वांगचुक यांनी 1994 मध्ये सरकारी शाळेत सुधारणा घडवून आणण्यासाठी सरकार, गावातील समुदाय आणि नागरी समाज यांच्या सहकार्याने ऑपरेशन न्यू होप सुरू करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. 2018 मध्ये, लडाखमध्ये "सर्जनशील, बाल-अनुकूल आणि क्रियाकलाप-आधारित" शिक्षणावर लक्ष केंद्रित करणारे शैक्षणिक सुधारणा कार्यक्रम विकसित करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांसाठी त्यांना रॅमन मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हिमालय परिसराच्या योग्य शाश्वत्व पर्यावरण पूरक विकासासाठी लडाखला राज्याचा दर्जा द्यावा या मागणीसाठी लडाख मधील प्रसिद्ध पर्यावरणवादी शास्त्रज्ञ सोनम वांगचुक आणि तेथील हजारो नागरिक मागील पंधरा दिवसापासून उपोषण करत होते. लडाख हा कडाक्याची थंडी, नैसर्गिक संशोधने जैवविविधतेने समृद्ध आणि विशेष सामाजिक व सांस्कृतिक वारसा लाभलेला प्रदेश आहे. तेथे अनेक शतकांपासून विविध जनसंमत आहे निसर्गाचे रक्षण करत आपले जीवन व्यतीत करत आहेत. विशेषतः या भागातील जमिनीची लूट आणि निसर्गाशी खेळ होत असताना या भागाला संविधानिक संरक्षण देणे अत्यंत गरजेचे असल्याचे तेथील जानतेचे मत आहे.

सध्या या परिस्थितीत व्यवसाय विकासाच्या नावाने पर्यावरणावर आघात केले जात आहेत. स्थानिकांच्या मतांना प्राथमिकता न देण्याचा परिणाम म्हणून तेथील नागरिक संविधानाच्या सहाव्या अनुसूची मार्फत होणाऱ्या विकासाच्या नियोजनात सामील होण्याचा अधिकार मागत आहे. याबाबत प्रश्न विचारणाऱ्यांना विकास विरोधी संबोधले जात असल्याचे सांगण्यात आले

लडाखचे नेतृत्व आणि केंद्रीय गृहमंत्रालय यांच्यातील ॲपेक्स बॉडी लेह (एबीएल) आणि कारगिल डेमोक्रॅटिक अलायन्स (केडीए) यांच्यात चर्चा संपुष्टात आल्यानंतर त्यांनी उपसमितीच्या पातळीवरील चर्चा आणि त्यांच्या स्वतंत्र बैठकीनंतर 6 मार्च रोजी उपोषण सुरू केले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी कोणताही ठोस आणि सकारात्मक परिणाम दिला नाही

इतिहासाच्या इतिहासातसुद्धा काही घटना,असे क्षण आहेत जे निर्णायक बिंदू म्हणून उभे राहतात. जेव्हा एखादी व्यक्ती, दृढ विश्वास आणि धैर्याने प्रेरित होऊन, अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध उठते , बदलाची मागणी करते आणि न्याय आणि समानतेच्या नवीन युगाची घोषणा करते तेव्हा तिच्यासमोर असे निर्णायक बिंदू, क्षण .घटना घडलेल्या असतात आणि म्हणूनच सोनम वांगडू यांचे उपोषण हा असाच एक क्षण आहे जो अत्याचाराच्या विरोधात एक धाडसी कृत्य आणि सर्व लोकांच्या हक्कांसाठी आणि प्रतिष्ठेसाठी एक मोठा आवाज आहे .

उपोषण सुरू करण्याचा वांगडूचा निर्णय हा वरवरचा नाही तर पद्धतशीरपणे अन्याय आणि मानवी हक्कांच्या उल्लंघनाविरुद्ध एक गणना आणि सखोल तत्त्वनिष्ठ भूमिका आहे. उपेक्षित समुदायांसाठी एक कार्यकर्ता आणि वकील म्हणून, वांगडू हे समाजाच्या सीमावर्ती लोकांद्वारे सहन केलेल्या दुःख आणि दडपशाहीचा प्रत्यक्ष साक्षीदार आहेत. भेदभाव, गरिबी आणि हिंसाचाराचे बळी, त्यांची दुर्दशा आणि पारंपारिक मार्गांच्या अयशस्वीतेचा सामना करत, वांगडू यांना कठोर कारवाई करण्याशिवाय दुसरा कोणताही मार्ग दिसत नाही, इतरांना न्याय मिळवून देण्यासाठी स्वतःच्या कल्याणाचाही त्यांनी त्याग केला आहे

59,146 चौरस किलोमीटर क्षेत्रफळ असलेला लडाख एक नितांतसुंदर प्रदेश म्हणून ओळखला जातो. लडाखच्या सीमा चीनशी जोडलेल्या असल्यानं, भारतासाठी सामरिकदृष्ट्या हा प्रदेश



.अत्यंत महत्त्वाचा आहे. लडाख प्रदेश जम्मू काश्मिर राज्याचा भाग होता. पण 5 ऑगस्ट 2019 रोजी केंद्र सरकारनं राज्यघटनेतलं कलम 370 रद्द करून घेतलं आणि जम्मू – काश्मीर राज्याचं द्विभाजन करून जम्मू-काश्मिर आणि लडाख अशा दोन केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती केली. लडाखला त्यामुळे स्वतंत्र अस्तित्व मिळालं पण आधी जम्मू-काश्मीरचा भाग म्हणून त्यांना मिळालेला विशेष दर्जा संपला. लडाखचा विकास आणि लडाखी लोकांची स्वतंत्र ओळख टिकवून ठेवली जावी यासाठी सरकारनं तेव्हा काही आश्वासनं दिली होती. पण ती साडेचार वर्षांत पूर्ण झालेली नाहीत.

गांधीजींच्या प्रभावाखाली त्यांनी, उपोषण हा अहिंसक प्रतिकाराचा एक प्रकार आहे असे म्हणत एखाद्या कारणाकडे लक्ष वेधण्याचे आणि तक्रारींचे निराकरण करण्यासाठी आणि अर्थपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी सत्तेत असलेल्यांवर नैतिक दबाव आणण्याचे साधन असल्याचे त्यांनी म्हंटले आहे . उपोषणाने , वांगडू यांनी साऱ्या जगाला एक शक्तिशाली संदेश पाठवला आहे . समाजात होणाऱ्या अन्यायांवर प्रकाश टाकण्यासाठी , वैयक्तिक दुःख सहन करण्यास तयार आहे. असे करताना, तो मानवतेच्या सद्सद्विवेकबुद्धीला शोषितांच्या दुःखाची साक्ष देण्यास आणि गप्प बसलेल्या आणि दुर्लक्षित झालेल्या लोकांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन करतो असे ते म्हणतात. .

हिमालयात इतर राज्यांमध्ये अंधाधुंद विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा ऱ्हास करणारे काही उद्योगपती आहेत. त्यांच्या कर्मांची किंमत तिथल्या लोकांना चुकवावी लागते आहे. तेच लोक आता लडाखच्या उंबरठ्यावर आले आहेत. कलम 370 रद्द होताच त्यांनी इथे जमिनींची पाहणी सुरू केली. स्थानिक राजकारण्यांचाही त्यांना पाठिंबा आहे. "हे राजकारणी लडाखला विकू पाहात आहेत आणि इथल्या लोकांचा विरोध वगैरे काही नाही असं चित्र निर्माण करत आहेत. त्यामुळेच हजारो आंदोलकांनी वांगडू यांना पाठिंबा देत उत्तर दिलं आहे." शिवाय, वांगडूचे उपोषण हे प्रचंड प्रतिकूल परिस्थितीत वैयक्तिक सामर्थ्याचा पुरावा दर्शवितं आहे. अशा जगात जिथे उदासीनता आणि आत्मसंतुष्टता वरचेवर राज्य करते, इतरांच्या फायद्यासाठी स्वतःचा जीव धोक्यात घालण्याची वांगडूची तयारी ही एक शक्तिशाली आठवण म्हणून काम करत आहे . एक व्यक्ती खरोखरच बदल करू शकते, घडवू शकते हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. त्यांची अशा प्रकारची कृती इतरांना अन्यायाविरुद्ध बोलण्यास प्रेरित करते, वैयक्तिक खर्चाची पर्वा न करता, जे योग्य आणि न्याय्य आहे त्यासाठी भूमिका घेण्यास प्रत्येकाला प्रोत्साहित करत आहे .

तरीही, वांगडूचे उपोषण त्याच्या टीकाकार आणि निंदाकर्त्यांशिवाय नाही. काही लोक असा युक्तिवाद करतात की असे टोकाचे उपाय अनावश्यक किंवा प्रतिकूल आहेत, कोणत्याही मूर्त परिणामांची हमी न देता स्वतःचे नुकसान होण्याचा धोका आहे. इतर लोक अर्थपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी उपोषणाच्या परिणामकारकतेवर प्रश्नचिन्ह उभे करतात, जेथे ते त्यांचे उद्दिष्ट साध्य करण्यात अयशस्वी ठरले आहेत. या चिंता वैध असल्या तरी, ते वांगडूच्या कृतींचे सखोल महत्त्व समजून घेण्यात अयशस्वी ठरतात - एक प्रतीकात्मक हावभाव जो वैयक्तिक बलिदानाच्या सीमा ओलांडतो आणि न्याय आणि मानवी प्रतिष्ठेच्या सामूहिक संघर्षाशी बोलतो.

शिवाय, वांगडूचे उपोषण अन्याय आणि असमानतेची मूळ कारणे दूर करण्यासाठी पद्धतशीर बदलाची तातडीची गरज अधोरेखित करते. त्याच्या प्रतिकाराची कृती गैरवर्तन किंवा दडपशाहीच्या विशिष्ट घटनांकडे लक्ष वेधून घेत असली तरी, हे शेवटी समाजात पसरलेल्या सखोल संरचनात्मक समस्यांचे लक्षण आहे. वांगडूच्या बलिदानाचा आणि न्यायासाठी लढलेल्या अगणित इतरांच्या बलिदानाचा खऱ्या अर्थाने सन्मान करण्यासाठी, आपण

(पान २ वर)

## मनाच्या हिंदोळ्यावर



बाबू घाडीगांवकर,
त्रिंबक, ता.मालवण.
मो. ९४२१७९५९५५.

# झरे आटले रे.....

माझ्या गावाला शिवकालीन तलाव लाभल्याने पुर्वी गावात विहीरी तशा कमीच होत्या. आमच्या बालपणापर्यंत हा तलाव खरोखरच समृद्ध होता. बिरामणाच्या आडव्याच्या पायथ्याशी बांधलेला हा तलाव पाहिला की शिवकाळात पाण्याचे नियोजन किती सूक्ष्मपणे केले जात होते याची खात्री पटते. तलावाच्या तीन बाजूंनी बारमाही वाहणारे, पाझरणारे जीवंत झरे होते. त्यामुळेच वर्षभर हा तलाव पाण्याने काठोकाठ भरलेला असे.

तलावाच्या तीनही बाजूंना गर्द व कीर्र झाडी होती. सर्व झऱ्यांचे उगमस्थानही याच झाडींतून असल्याने भर दुपारीसुद्धा झऱ्याचे पाणी थंडगार असायचे. एका बाजूला तर केगदीची दाट झाडी होती. या केगदीच्या काटेरी झुडुपांत शिरून 'हाते' काढणे हा आमचा बालपणीचा छंदच होता. 'हाता' म्हणजे केगदीची फुलण्यासाठी तयार झालेली लांबलचक कळी. केगदीच्या झाळीत नाग वावरतात. केगदाच्या सुगंधासाठी ते येतात अशी घरातल्या मोठ्या माणसांनी भीती घातली तरी आम्ही कोयती घेऊन केगदीच्या झाळीत शिरायचोच. केगदीतून हाता काढणे हे खरेच कसब होते आणि आमच्या पिढीला ते चांगलेच अवगत होते. त्या काळात आपल्या परिसरात उपलब्ध होणाऱ्या अशा प्रत्येक गोष्टीस मोल असल्याने अनेकदा हाते शोधण्यासाठी आमची झोंबाझोंबीही व्हायची. मात्र आम्ही काढून व घरी नेऊन ओल्या कपड्यात गुंडाळलेल्या हात्याचे केगद आईने डोक्यात माळले की फार मोठे समाधान लाभायचे.

अनेकदा आमच्या नजरेतून सुटलेले हाते केगदीच्या झाळीत फुलले की त्या परिसरात केवड्याचा मस्त सुगंध दरवळायचा. तलावातील मुख्य झरा याच केगदीच्या झाळीतून तळ्यात यायचा. ऐन उन्हाळ्यातही या झऱ्याचे पाणी आटलेले आम्ही कधी पाहिले नाही. तलावातील पाणी गावकरी कपडे धुण्यासाठी, बागेसाठी, जनावरे धुण्यासाठी वापरायचे. या मोठ्या झऱ्याला एक पन्हळ लावला होता. या पन्हळाचे पाणी मात्र सारेजण पिण्यासाठीच वापरायचे. या पाण्याची चव



फारच गोड व अवीट होती. तलावाकाठावरच्या झाडीचा परिसर 'बांबर' नावाने प्रसिद्ध होता. या बांबरात अनेक जातीचे जुनाट व विशाल वृक्ष होते. बांबरातच एका बाजूला आकारी ब्राह्मणदेवाचे तर दुसऱ्या बाजूला क्षेत्रपालाचे देवस्थान आहे. क्षेत्रपालाच्या पिंपळवृक्षाची सततची सळसळ नेहमीच तेथील वातावरणात एक नाद निर्माण करते. पुर्वी या तलावात पाच ते सहा पुरुष खोल पाणी असायचे असे म्हणतात. त्या काळात तलावाच्या वा विहीरीच्या पाण्याची खोली फुटपट्टीत नाही, तर पुरुषात मोजण्याची पद्धत होती. तलावाच्या मध्यभागी पाण्याची खोली सर्वाधिक होती.


आम्ही पोरे बालपणी सुट्टीच्या दिवशी दिवसभर तलावात पाहायचो, पकडापकडी खेळायचो. पण मध्यभागात खोल पाण्यात न जाण्याची सक्त ताकीद आम्हाला होती. तलावात काठाकाठाने विविध प्रकारचे हिरवेगार शेवाळ होते. झुपकेदार, केसाळ, बारीक, गोल पाने, फुले असलेल्या, लांबट पाती असलेल्या शेवाळाच्या अनेक जाती तलावात पहावयास मिळत. याशिवाय लव्हाळेही भरपूर होती. माझा बाबा तीच लव्हाळे दाखवून मला म्हणी शिकवायचा," महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती!"

तळ्याच्या एका बाजूला दगडी पापडी होती. ही पापडी पाहिली की शिवकालीन बांधकामाची मजबुती डोळ्यांत भरायची. अगदी अलीकडील काळापर्यंत ही पापडी अभेद्य व टिकून होती. याच बंधाऱ्यात दोन शिवकालीन मुशी होत्या. एका मुशीतून वाहणारे पाणी गाडगीळ गुरूजींच्या घरापासून ते अगदी थेट आरेकरवाडीपर्यंत जायचे. दुसऱ्या मुशीचे पाणी देऊळवाडीतून पुढे साकवापर्यंत जायचे. तलावात येणारे अनेक झरे बारमाही असल्याने या मुशींतून रात्रंदिवस पाणी वाहत असायचे. मुशीतून हे पाणी पाटाने पुढे जायचे. याच पाण्यावर गावातील नारळी-पोफळीच्या बागा, भाज्यांचे मळे छान डवरले होते. गावातील बागायतदार कधी कधी उन्हाळ्यात अधिक पाण्यासाठी मुशीवर बांध घालून पाणी साठवीत. मग मुशीवर सारीक जोडून सारकाने पाणी उपसून मुशीतून पुढे पाटाने पाणी बागेत सोडत. सारीक हे पाणी उपसण्याचे पारंपारिक साधन होते. भेलड्या माडाच्या झावळीच्या देठाकडील भागापासून हे सारीक बनवीत. तलावात अनेक प्रकारचे मासे सदैव विहरत असायचे. बेडूक, गौळणी, खेकडे, कासवही दिसायचे. याशिवाय तलावात पांढरी, रक्तवर्ण कमळे होती. तलावात ज्या भागात सहसा कोणी जात नसे, त्या भागात ही कमळे दररोज फुलायची. पावसाळ्यात सुट्टीच्या दिवशी 'गळ' घेऊन आम्ही पोरे तासनतास या तलावात मासे गरेवायचो. मासे गरेवणे हा तसा सहनशक्तीची कसोटी पाहणारा छंद. कधी आणि किती वेळात मासा गळाला लागेल याचा अंदाज नसे. बेलका, वाळयची पात, काढय, मराल, ठीगूर, टोळकी, डेम्के, खरबे, शेंगटी यांसारखे मासे या तलावात हमखास मिळत. पावसाळ्यात समुद्रातील मासेमारी बंद असताना हेच मासे गावातील अनेकांचे उदरनिर्वाहाचे साधन बनत.

मात्र सध्या या तलावाची रयाच बदलून गेली आहे. तलावाचे पाणी अधिक मोठ्या प्रमाणात गावातील बागायतीला नेण्यासाठी, तलावातील गाळ उपसण्यासाठी या तलावाचा मुख्य बंधारा, पापडी तोडल्याने, फोडल्याने आता या तलावाला फार मोठे भगदाड पडले आहे. गेल्या काही वर्षांपासून या तलावात पाणी साठून राहत नाही. पावसाळ्यात पुराच्या लोटासोबत तलावातील सारी मत्स्यसंपदा कधीच तलावातून बाहेर गेली आहे. तलावाच्या काठावरील बांबरात बेसुमार वृक्षतोड झाल्याने तेथील दाट झाडी, थंडावा नष्ट होऊन तो सारा परिसर आता उघडाबोडका व रणरणीत झाला आहे. केगदीच्या झाळीही आता अस्तित्वात नाहीत. तलावात येणारा मुख्य झरा आजही बारमाही वाहतो. मात्र त्याला पुर्वीची शान नाहीच. तलावात शिरणारे असंख्य छोटे झरे, पाझर आता बारमाही वाहत नाहीत. त्यामुळेच सध्याच्या उन्हाळ्यात हे तळे अर्धे अधिक कोरडे ठणठणीत होते. आमच्या बालपणीचा बराचसा काळ या शिवकालीन तलावाच्या सान्निध्यात गेला. त्यामुळेच या तलावाची सध्याची अवस्था आम्हाला पाहवत नाही. मात्र कोणा सजग कारभाऱ्याने हा तलाव पुर्वी होता तसाच बांधून घेतला तर निश्चितपणाने वाटते की, या तलावाला पुर्वीइतके का नसेनात, पण थोडेथोडके तरी समृद्धीचे दिवस नक्कीच येतील.

# सोनम वांगडूंचे उपोषण

**(पान १ वरून)**



असमानता आणि उपेक्षितपणा कायम ठेवणाऱ्या शक्ती आणि विशेषाधिकारांच्या अंतर्निहित प्रणालींकडे लक्ष दिले पाहिजे.

शेवटी, सोनम वांगडूचे उपोषण दडपशाहीचा सामना करताना प्रतिकार आणि लवचिकतेच्या चिरस्थायी वारशाची एक शक्तिशाली आठवण आहे. त्यांचे निःस्वार्थ बलिदान त्या सर्वांसाठी आशेचा किरण म्हणून काम करते जे न्याय आणि समानता प्रबळ असलेल्या जगाचे स्वप्न पाहण्याचे धाडस करतात. वांगडूच्या धैर्याची आणि दृढनिश्चयाची आपण साक्ष देत असताना, आपल्याला एका चांगल्या जगाच्या संघर्षात त्याच्यासोबत सामील होण्यासाठी प्रेरणा मिळू शकेल - असे जग जिथे सर्व लोकांच्या हक्कांचा आणि सन्मानाचा आदर केला जातो.

आज कोकणातही चाललेली बेसुमार वृक्षतोड, डोंगरांचा चालेल ऱ्हास, खाणीसाठी खोदले जाणारे डोंगर यांनी कोकणातील जैविकसंपत्ती धोकादायक स्थितीत आहे. कोकणातील नेत्यांची चाललेली पळवापळवी, खोके वाटप यातून स्वतःचा स्वार्थ प्रत्येकजण साधून घेत असलेले दिसून येत आहे. कोकण आजपर्यंत अगदी आजही विकासाच्या आराखड्यात अगदी शेवटच्या पातळीवर आहे. त्यामुळे जनतेने आता लक्षात घ्यावे कि प्रत्येकजण फक्त आणि फक्त स्वतःच्या विकासाकडे लक्ष ठेऊन आहे . सिडकोच्या आगमनानंतर किती महत्वाच्या जमिनी कोणत्या उद्योगपतीला दिल्या जाणार आहेत हे सर्व कळण्यासाठी कोण मार्ग कोकणी जनतेकडे नाही. म्हणूनचाततरी शहाणे होऊन आपल्या जमिनी राखणे आणि आपला विकास आपणच साधने हा एकच पर्याय आहे.

**पर्यावरणाचा ऱ्हास करून विकास नको आहे हे सांगण्यासाठीच लडाखवासीय एकत्र आले आहेत.एकजुटतेची ताकद खूप मोठी असते**

## साप्ताहिक सदर
# तिचा गौरव



चित्रा अविनाश नानिवडेकर,
सफाळे- पालघर.
मो. 9969669523

**लेखिकेचा परिचय :**
चित्रा नानिवडेकर या प्रथितयश लेखिका व संवेदनशील कवयित्री आहेत. समाजात वावरताना आपल्या अवती भवती दिसणाऱ्या, दैनंदिन जीवनात जगताना पावलोपावली संघर्ष करणाऱ्या स्त्रियांच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न चित्रा नानिवडेकर आपल्या साप्ताहिक सदरातून करणार आहेत.

## तिच्या' नजरेतून 'ती'

'रचना सेनगुप्ता होतं तिचं नांव. मी एस. एन. डी. टी. मध्ये एक प्रोजेक्ट करत असताना ती पी. एच. डी. करत होती. अतिशय देखणी, मृदू बोलणं, नम्र स्वभाव. मी तिच्याशी आडनाव ऐकून हिंदीत बोलत असताना तिने हसून म्हटलं "अगं मी मराठी आहे माहेरची"
"ओह...लव्ह मॅरेज? सही.. कुठे राहतेस?"
"नवी मुंबईला...कॉलेज खालसा."
"बापरे.. आणि पी. एच.डी. साठी इथे चर्चगेट? खूपच धावपळ होत असेल."
हसत म्हणाली "झाली सवय आता"

मुंबई मध्ये हे एक असतं. लोकं कुठूनही कुठेही जा ये करतात.ती नेहमी घाईत मात्र असायची. आज काय बँकेत जायचेय. लोन चा हप्ता, वाशी च्या मार्केट मध्ये स्वस्त मच्छी मिळते, सुंदराबाई ला बंगाली साड्यांचा सेल आहे तर सासू आणि नणंदे साठी साड्या घ्यायला जायचंय. मला कौतुक वाटायचं. नवरा कोलकाता ला आणि ही मात्र इथे सासरच्या माणसांसाठी एवढी धडपड करयची.

हळूहळू तिची माझी मैत्री झाली.तिचं आणि सुकुमार चं कॉलेज एक होतं. तिने पुढे कॅम्पुटर चे बरेच कोर्सेस केले. सुकुमार ने आय. टी. डिप्लोमा करून चांगली कंपनी जॉईन केली. पण लग्नानंतर एका वर्षांत त्याची पोस्टिंग कोलकत्ता ला झाली.

रचना च्या घरून ह्या लग्नाला विरोध होता म्हणून तिने सासरच्या माणसांना आपलंस करण्यात काहीच कसर ठेवली नाही. ते लोक पण रोचना...रोचना चा जप करून तिच्या कडून सगळीच कामं करून घेऊ लागली.

एकदा इतक्या वाईट अवतारात ती कॉलेज ला आली की आमच्या मॅडम पण तिच्याकडे बघून म्हणाल्या 'घरी सगळं ठीक ना? प्रॉब्लेम नाही ना?' तिने डोळे पुसत नुसती मान हलवली.

मी कॅन्टीन मध्ये तिला छेडलं तर गळ्यात पडून रडायला लागली आणि कर्म कहाणी सांगितली. लग्ना नंतर केवळ एकच वर्ष नवरा जवळ राहिला. तेवढयात त्याने भलं मोठं लोन दोघांच्या नावावर घेऊन स्वतः च्या कंपनी मधून लोन काढून हे घर घेऊन सासू सासर्यांना आणि दिराला सेटल केलं. एकदा त्यांना घर मिळालं आता त्यांचे तेवर बदलले. रोज काही नी काही कुरापती काढतात. आज मच्छी नीट शिजवली नाही. आजकाय कपडे नीट धुतले नाही. नणंद झोपून असते. दिर येता जाता टोमणे मारतो...कधी कधी तर वाईट स्पर्श सुद्धा करतो ग...मी पुरती अडकली आहे.

सासूबाई दुर्लक्ष करतात. सासरे माझी बाजू घेतात ते पण घरात चालत नाही. मी जास्तीतजास्त वेळेत म्हणूनच बाहेर घालवते. मी सुट्टीत त्याच्या कडे जाते तेंव्हा पण राब राब राबते. तुम्हाला माहितीये त्याच्या साठी मासे तळून डबा भरून फ्रीझ करून येते. चाळीस पन्नास पोळ्या करून डब्यात भरून ठेवते. पुन्हा इकडे पण कामाचा डोंगर असतोच. सासू ला माझ्या कामाचं नाही पण महिन्याच्या पगाराची पडली असते.


आता ह्या सुट्टीत सुकुमारकडे जाणारे. एकतर त्याला तरी ट्रान्सफर घ्यायला लावते. नाहीतर मी इथलं सगळं सोडून कायमची तिकडे जाते.
मी म्हटलं 'आई वडिलांना माहिती आहे का?इतका त्रास देतात ते?'
उदास हसत म्हणाली 'कसलं प्रेमाचं भूत होतं ग मानगुटीवर सुकुमार सांगेल तसं वागत होते. वडिल माझे नेव्हीत आहेत. सहा महिन्यातून यायचे. आईला चांगलीच गुंडाळायचे मी. ह्याचे बाबा आमच्या नेव्ही कॅन्टीन मध्ये साधे वर्कर होते. हा कॉलनीत क्रिकेट खेळायचा. मी त्याच्या खेळाच्या प्रेमात पडले...आई बाबांना धक्काच बसला. आमचं स्टेट्स खूप वरचं होतं. पण म्हणतात ना प्रेम आंधळं असतं.'
'असू दे...तरीही माझं ऐक एकदा निदान आईला तरी भेटून ये. काही झालं तरी आतड्याची माया असते.'

(



**(पान ९ वर)**





# अध्यात्म

ज्योतिर्विद
उदय दुदवडकर,
बुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४



## युद्धात मनुष्य जन्माची सार्थकता

अध्यात्मज्ञान घेत असताना मनुष्य जन्माच्या सार्थकतेचा विचार अंशात्मक तरी व्हायला हवा अन्यथा अध्यात्मज्ञान घेण्याचे महत्त्व कळणे कठीण. मनुष्य जन्म धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ साधून सार्थकता साधण्यासाठीच्या, पुनर्जन्म चक्रातून मुक्ती साधनेचा अंतिम टप्पा आहे. या टप्प्यात ज्ञान, विज्ञान यांच्या उमजण्यातून आणि अनुभूतीतून मनुष्याने स्वत:तील परमात्म्याला शोधून पाहण्याचे कर्म साधणे आणि परमात्म्याचे दर्शन साधून त्यात आत्मा विलिन करणे हे परम साध्य साधण्यात यश मिळवायचे आहे. मानवी जीवनाचे अंतिम सर्वोच्च यश जे, ते (स्वआत्मा ज्यातून शरीरात आला त्या ) परमात्म्याशी स्वत:च्या आत्म्याचे मेलन साधून परम दिव्यत्वात सामावून जाणे. जीवनाचे वास्तविक ध्येय म्हणजे भवबंधनातून मुक्त होऊन भगवद्धामात प्रवेश करणे हे होय.


प्रपंचात भबंधनात असता अनेक युद्धाचे प्रसंग माणसाच्या जीवनात येतच असतात. जी व्यक्ती स्वार्थ बुद्धीने स्वैर वागते तिला कशाचे काही देणे वाटत नसते. तिला फक्त आपले ते आपले आणि दुसऱ्याचे तेही आपलेच वाटत असते मात्र आपले ते दुसऱ्याचे हा विचार ती व्यक्ती मनाला स्पर्शुही देत नसते. अशी व्यक्ती जेव्हा पारमार्थिक जीवन जगण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीच्या राशीला येते तेव्हा परमार्थिक जीवन जगणाऱ्या व्यक्तीच्या जीवनात खळबळ माजवते. या मुजोर, अधम व्यक्तीला धडा शिकवावा, जश्यास तसे चोख उत्तर द्यावे हे असे विचार परमार्थ साधणाऱ्या व्यक्तीच्या मनात आल्यावाचून राहत नसतात परंतु त्या परमार्थ साधकाला भांडण, तंटा, क्लेश नको असतात. टाळावयाचे असतात कारण त्याला षड्-रिपुंना जवळ करावयाचे नसते तर त्यांच्यापासून दूर राहून परमार्थ साधना करावयाची असते. यासाठी परमार्थ साधक समोरच्या द्वाडाबरोबर लढत करण्याचे टाळतो.

समोरच्या कपटी अघोरी व्यक्तीला वाटत असते की, हा माणूस आपले काहीही वाकडे करू शकणार नाही. आपल्या कृतीला, छळाला हा विरोध करीत नाही म्हणजे हा दुबळा आहे. भित्रा आहे. ह्याला कुणाचा पाठिंबा नाहीय. आपण ह्याला सहज लुबाडू शकतो. आपले काहीही बिघडूवू शकणार नाही हा आणि आपण याचे ते सर्व आपले सहज करू शकू. अशा विचारातून समोरच्या अघोरी व्यक्तीचा दांडगावा वाढत जातो. अहंकार उत्तरोत्तर वाढतच जातो आणि ती व्यक्ती परमार्थ साधकाला अधिकच छळू लागते. परमार्थ साधकाला कमजोर समजून त्याला लुटत राहते. त्याची संपत्ती, जमीन, जागा, झाडे, घरदार ... बळकावण्याचा राजरोस प्रकार करू लागते. अशावेळी परमार्थ साधक आध्यात्मात थोडे पुढे जाऊन असा विचार करतो की, तो जे लुटत आहे ते मृत्यूनंतर ना मी घेऊन जाणार आहे ना तो घेऊन जाणार आहे. मात्र मी तटस्थ, निर्मोही, निर्लोभी आणि शांत राहिलो तर माझ्या पदरी निर्मोह आणि शांती पडणार आहे. या उलट छळणाऱ्याच्या पदरी गर्व आणि लालच. मला मोक्ष मिळणार आहे आणि त्याला पुनर्जन्माच्या भीषण गटांगळ्या, भौतिक बंधनांचा पिंजरा आणि आयुष्याच्या उत्तरार्धात दुर्धर क्लेश व पश्चाताप.


असे युद्ध हे परमार्थ साधकाकडून संतपणे चालू असते आणि अघोऱ्याकडून आक्रमक गतीने चालू असते. परमार्थ साधकाचा शांतपणा अघोरी दुष्टाच्या अहंकाराची पातळी वाढवीत असतो आणि एक वेळ लवकरच अशी येते की, अघोऱ्याचे शंभर अपराध भरले जाऊन त्याचे आघोरी कर्म त्याच्याच मानेवर बसते आणि त्याचा शिरच्छेद होतो. अर्थातच परमार्थ साधकाची साधना आणि संयम यांचा मेळ एक परम शस्त्र, सुदर्शन चक्र बनून अघोऱ्याचा नि:पात करते. तात्पर्य असे की, कर्म साधनेत दुसऱ्याचा छळ करून कपटबुद्धीने त्याला लुटले असता लुटणाऱ्या व्यक्तीच्या विवेकाचे अध:पतन होते आणि त्याच्या मनुष्यजन्माचे वाटोळे होते. इतकेच नव्हे तर त्याची पुढील वंशावळ या दृर्भोगाचे बळी पडतात. परधन मिळवण्याच्या लालसेने अंध आणि अज्ञानी झालेल्या अघोऱ्याला हे कसे बरे कळावे?

भगवान श्रीकृष्ण यांनी शिशुपालाच्या एक-एका अपराधाकडे जस-जसे दुर्लक्ष केले तस-तसे शिशुपालाचा अहंकार वाढत जाऊन अपराध वाढतच गेले आणि जेव्हा त्या अपराधांची शंभरी भरली तेव्हा त्याच्या अघोरीकर्मांनी आणि अपराधांनी त्याचाच शिरच्छेद करवीला. परमार्थ साधकाकडे संयम हे मोठे बलशाली शस्त्र असते जे भांडण, तंटा, वादविवाद न करताच कपट करणाऱ्याचा, छळ करणाऱ्याचा, लुटारूचा अहंकार वाढवते आणि त्याच अहंकारानेच त्याचा पराभव साधून विजय प्राप्त करते. या लढतीत काळ अर्थात परमेश्वर धर्माच्या बाजूनेच सदैव विजयध्वज फडकावीत असतो.

**(पान ९ वर)**



## सोनेरी दुनिया



श्री. श्रीराम शेटये.
नालासोपारा.

# गायनक्षेत्रातील भिष्म पितामह कुंदनलाल सहगल



सन १९३२ मुकपटांच्या जमान्यातून चित्रपटसृष्टी हळू हळू बोलपटांच्या दिशेने वाटचाल करीत होती. अशा बोलपटांच्या क्षितिजावर एक नविन सुर्य उदयास येत होता. त्या क्षितिजावर कुंदनलाल सहगल नावाच्या एका तरूण गायक अभिनेत्याने आपले नाव कोरले होते. बघता बघता त्याच्या गायन आणि अभिनयाने शिखर गाठले होते. कुंदनलाल सहगल यांनी कोणतेही शास्त्रिय संगीत शिक्षण घेतले नव्हते.

पण लता मंगेशकर, महंमद रफी, मुकेश, किशोर

सन १९३२ मुकपटांच्या जमान्यातून चित्रपटसृष्टी हळू हळू बोलपटांच्या दिशेने वाटचाल करीत होती. अशा बोलपटांच्या क्षितिजावर एक नविन सुर्य उदयास येत होता. त्या क्षितिजावर कुंदनलाल सहगल नावाच्या एका तरूण गायक अभिनेत्याने आपले नाव कोरले होते. बघता बघता त्याच्या गायन आणि अभिनयाने शिखर गाठले होते. कुंदनलाल सहगल यांनी कोणतेही शास्त्रिय संगीत शिक्षण घेतले नव्हते.

पण लता मंगेशकर, महंमद रफी, मुकेश, किशोर कुमार, मन्ना डे, जगजीत सिंह असे सर्वच गायक त्यांना आपले गुरू मानतात. त्यांच्या आवाजातून प्रेरणा घेऊनच हे गायनक्षेत्रात आले. त्यांच्या गायकीची नक्कल पुढे सर्वच प्रमुख गायकांनी केली.

त्यांची गाणी पंडीत भिमसेन जोशी, लता मंगेशकर, जगजीत सिंह यासारखे गायक सहगल याच्या निधना नंतरही जीव ओतून गात राहिले. त्यांची गाणी जगभरातील संगितकार आणि गायनक्षेत्रातील कलाकारांसाठी आव्हान आहे. सहगल हे आजही प्रेरणादायी आहेत. 'बाबुल मोरा नैहर छूटो जाए' सारखी त्यांची गाणी नवोदित गायकही जीव ओतून गात असतात.

सहगल यांचा जीवन प्रवास सोपा नव्हता. अवघे त्रेचाळीस वर्षाचे आयुष्य पण काळाच्या छाताडावर त्यांनी आपले नाव सुवर्ण अक्षरात कोरले. जालंधर मधून जम्मूमध्ये येऊन वसलेल्या सहगल परिवारात कुंदनलाल यांचा जन्म सन ११ एप्रिल १९०४ साली झाला. त्यांचे वडील कश्मीरचे महाराज प्रताप सिंह यांच्या राज्यात तहसिलदार होते.

कश्मीरमधिल निसर्गाच्या सानिध्यात पहाटे पहाटे कानावर पडणारे बासरीचे मधूर स्वर आणि गुराख्यांची गाणी ऐकत कुंदनचे बालपण संगीताकडे ओढा घेत होते. कुंदनची आई छान गात असे. त्याच संस्कारात कुंदन बाल्यावस्थेत वाढत होता.अवघा बारा वर्षाचा कुंदन एकदा कश्मीरचे महाराज प्रताप सिंह यांच्या दरबारात आपल्या वडीलांसोबत गेला होता. तेथे त्याने संत मीराबाई यांचे भजन गायले. सर्व दरबार टाळ्यांच्या कडकडाटांने दणाणून गेला. महाराजांनी कुंदन ची पाठ थोपटली. महाराज म्हणाले.' भविष्यात हा मुलगा मोठा गायक होईल. कुंदन ची कीर्ती ऐकून एकदा सुप्रसिध्द रामलीला कलाकार परशुराम नागर घरी आले. वडीलांना समजाऊन कुंदन ला रामलीला मध्ये सीतेच्या भुमिकेसाठी तयार केले. सीता बनलेला कुंदन आपल्या अभिनय आणि गायणाने प्रेक्षकांच्या डोळ्यात अक्षरक्ष: पाणी आणत असे. शो संपल्यावर महिला सीता बनलेल्या लहानग्या कुंदन च्या पायाला स्पर्श करून नमस्कार करीत असत.

कुंदनलाल सहगल यांनी जम्मूमधील 'प्रिन्स ऑफ वेल्स' कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. परंतू शिक्षण अर्धवट सोडून कुंदनलाल जालंधरला परतले . तरूणपणी आपल्या गाण्याच्या वेडासाठी घर सोडले. दिल्लीची ट्रेन पकडली मित्रांच्या मदतीने दिल्लीत नोकरी मिळाली पण संगीत क्षेत्राची आस स्वस्थ बसू देत नव्हती. त्याच दरम्यान त्यांचे जालंधर मधील स्नेही संगीत नर्दिेशक हरिश्चंद्र बाली यांची भेट झाली. त्यांनी सहगल यांची ' न्यू थिएटर' चे मालक बी. एन. सरकार यांच्याकडे शिफारस केली. 'न्यू थिएटर' ने सहगल यांना घेऊन 'मोहब्बत के आसु ' हा पहिला चित्रपट काढला.


'न्यु थिएटर' च्या 'चंडीदास' व 'देवदास' या चित्रपटांनी सहगल यांची कारकिर्द झळाळून गेली. एकापेक्षा एक चित्रपट सुपरहीट होत असतानाच सन १९४० मध्ये 'न्यु थिएटर' ला लागलेल्या आगीत 'न्यु थिएटर' भस्मसात झाल्यामुळे डबघाईला आले. त्यातच दुसरे महायुद्ध सुरू झाले. आकाशात लडाखु विमाने घिरट्या घालू लागली. कलकत्ता मधिल प्रेक्षक भितीमुळे घराबाहेर पडणे बंद झाले. थिएटर ओस पडू लागली.

मुंबईतील फिल्म इंडस्ट्री त्या मानाने चांगली चालली होती. पृथ्वीराज कपूर, केदार शर्मा , के. एन. सिंह 'न्यु थिएटर' सोडून मुंबईत आले. 'न्यु थिएटर' चे संगीतकार खेमचंद प्रकाश यांनी मुंबईत 'रणजीत मुव्हीटोन' बरोबर काम सुरू केले होते. त्यांना सहगल सारखा दुसरा आवाज सापडत नव्हता. त्यांनी मुव्हीटोन चे मालक चंदुलाल शहा यांना सहगल यांना मुंबईत बोलावण्यास सांगितले. सहगल मुंबईत आल्यावर रणजीत मूवीटोन चे 'सुरदास' आणि 'तानसेन' १९४४ साली हे दोन चित्रपट त्यांना मिळाले. या चित्रपटांची गाणी सुपरहीट झाली. गायन आणि अभिनय क्षेत्रात सहगल मुंबईत हिंदी चित्रपटांचे पहिले सुपरस्टार झाले.

काही काळ मात्र अपयशाचा सामना करावा लागला. सुपरस्टार असलेल्या सहगल यांची महागडी बिदागी देणे चित्रपट निर्मात्यांना परवडणे अवघड झाले. त्यामुळे चित्रपटांत सहगल यांना काम मिळणे अवघड झाले. काही चित्रपट मिळाले पण ते फ्लॉप झाले. इंडस्ट्रीत फ्लॉप चित्रपटांचे नायक असा त्यांच्यावर शिक्का बसू लागला.

अपयश पचवणे जड गेले त्यातच दारूचे व्यसन लागले. आजारी पडलेले सहगल यांनी आपल्या गावी जालंधर ला परतण्याची तिकीड काढली. पण शेवटचा क्षणी "शाहजहान" चित्रपटाची ऑफर आली. परत एकदा सहगल यांनी भरारी घेतली. 'शहाजहान' च्या गाण्यांनी लोकप्रियतेचे शिखर गाठले. पण सहगल यांचा आजार वाढत गेला. सहगल जालंधर ला आपल्या जन्मगावी परतलेले त्यांनी बिस्तर पकडला. त्यातून ऐन उमेदीत सन १८ जानेवारी १९४७ साली सहगल ईहलोक सोडून गेले. चित्रपट सृष्टी एका महान कलाकाराला मुकली.

## वाचायलाच हवे असे





श्री. विलास भि.कोळी
MOB - 9763084499

# गड, किल्ले, गढी "वाडा" बांधकामात दगडाचा न उलगडलेला इतिहास - भाग १

**लुप्त होत चालेले वाडे आणि त्याबरोबर विस्मृतीत चाललेली वाडा संस्कृती याबद्दलची माहिती देणारे वाडा हे पुस्तक श्री. विलास कोळी यांनी लिहून 'वाडा' संस्कृतीची ओळख येणाऱ्या पिढीसाठी पुस्तकरूपाने अमूर्त ठेवले आहे. त्या पुस्तकातील काही भाग पुन्हा एकदा वाचकांच्या भेटीला येत आहे**

आपल्या पूर्वजांनी उगाच म्हटलेलं नाही राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा. महाराष्ट्राचा सर्वात जुना सोबती कोण? महाराष्ट्रावर सर्वाधिक प्रभाव कोणाचा ? महाराष्ट्राची खरी ओळख काय ? महाराष्ट्र समजून घेण्यासाठी कुठून सुरुवात करावी ? या सर्वांचे उत्तर एकच तो म्हणजे आपल्याकडील काळा खडक. अर्थात ब्लॅक बेसाल्ट. कारण तो समजल्याशिवाय आपणाला महाराष्ट्र समजणार नाही. आणि आपली संस्कृतीही समजणार नाही. महाराष्ट्र घडविण्यात दगडाचा फार मोठा वाटा आहे.

अशा दगडांनीच इतिहास घडवला असं म्हटलं तरी अतिशयोक्ती ठरणार नाही. कारण ब्लॅक बेसाल्टने सर्वच गोष्टी प्रभावित केल्या आहेत. आपला इतिहास, भूगोल, संस्कृती आणि अर्थव्यावस्था सुद्धा. आपल्या संस्कृतीच्या जडणघडणीत दगडाची भूमिका बघायला गेलो तर सर्वात जास्त लेणी महाराष्ट्रात आहेत. त्याही काळ्या पाषाणात. त्यात बौद्ध, जैन, हिंदू, अशा सर्वच लेणींचा समावेश आहे. दगडाचा प्रभाव सांगणारी कितीतरी उदाहरणे आहेत. आदीमानवाच्या हातात पाहिलं हत्यार आलं ते म्हणजे दगड. आणि तिथूनच दगडाची खरी सुरवात झाली. आदिमानवाला प्रतिकूल परिस्थितीत आधार देणारी दगडी हत्यारे, गड, किल्ले, गढ्या, वाडा बांधकामांना आकार देणारे दगडच आहेत. मंदिराची शोभा वाढवणारा दगडच, धरण बांधकामासाठी वापरलेला दगडच. गुहा, लेणी, घाट, पुष्करणी, बारव, मूर्ती अशा उदाहरणाची यादी कितीतरी मोठी होईल. मुद्दा इतकाच की या खडकाने आपल्यावर इतका प्रभाव टाकला आणि अजूनही टाकत आहे. त्याच्याकडे कसं पहायचं हेही कुणी आजपर्यंत कुणी उलगडून सांगितलेले नाही. त्यात काय सौंदर्य दडलं आहे. त्याच्यातील वैशिठ्यपूर्ण रुपाची सैर ही कुणी घडवून आणली नाही. म्हणूनच तर तो केवळ दगड राहिला आहे. हे रडगाण गाण्यापेक्षा दगडाला उजाळा देण्याचा हा माझा छोटासा प्रयत्न.

निसर्गाने शेकडो, हजारो वर्षे व्यतीत करून ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे झालेल्या लावारसांपासून दगड निर्माण केलेला आहे. म्हणजे भूकंप झाला उल्कापाताने लाव्हारस बाहेर पडला. त्याला थंड व्हायला काही वर्ष लागली. मग सह्याद्री निर्माण झाला. त्याच्या बाजूने माणस आली, सह्याद्रीचे महत्व, कठीणपण, सह्याद्रीचे अप्रत्यक्षरित्या काय काम होते. त्याचा उपयोग आपल्या पूर्वजांनी कसा केला, आपल्याला सोईचे व शत्रूला अवघड कसा केला. त्याचा योग्य वापर स्थापत्य कलेमध्ये आपल्याला दिसतो. वाडा, गढी, किल्ले, मंदिर, मूर्ती, शिल्प याकडे आपले पूर्वज खुप वैज्ञानिक, शास्त्रीय, अभ्यासपूर्ण पद्धतीने पाहत होते. त्याबाबत त्यांनी इतके विपूल लिखाण करुन ठेवले आहे की ते वाचल्यावर अक्षरश: आपण स्तंभित होऊन जातो. दगडाचे सुद्धा लिंग प्रकार असतात हे वाचल्यावरच मलाही कळले.

दगड जमिनीतून किंवा डोंगराच्या खाणीतून काढतात. बांधकाम निर्मितीसाठी डोंगराच्या खाणीतून काढलेले दगड चांगले समजतात. त्यामागे कारण असे. जमिनीतून काढलेल्या दगडांवर ऊन, वारा, पाऊस या नैसर्गिक शक्तिंचा परिणाम जास्त होतो त्यामानाने खाणीतून काढलेल्या दगडांवर कमी होतो. दगडाचे लिंग नुसार वर्गीकरण खालील प्रमाणे.

पुल्लिंगी दगड: हे दगड आकाराने मोठे त्यावर ठोकले असता घंटी प्रमाणे खणखणीत आवाज येतो. आयताकृती, सौंदर्यपूर्ण, मूळापासून वरच्या टोकापर्यंत एका रंगाची, वजनदार, घणाचा घाव घातला असता जिच्यातून अग्निस्फुल्लिंग बाहेर पडतात असे दगड पुल्लिंगी समजतात. पुल्लिंगी दगड भिंत व शिखर बांधकामात वापरतात.

**स्त्रीलिंग दगड:** हे दगड मध्यम आकाराचे, तालवाद्याप्रमाणे जिच्यातून आवाज येतो. मूळाच्या बाजूला जाड व टोकाच्या बाजूला मूळापेक्षा कमी जाड, मध्यम आकाराची, स्पर्शाला शीतल लागणारी शिळा स्त्रीलिंगी समजतात. स्त्रीलिंगी दगड अधिष्ठान व उपपीठ बांधतांना वापरतात.

**नपुंसकलिंगी दगड:** हे दगड आकाराने लहान, गोलगरगरीत, रुक्ष, बद्द आवाज येणारा, मूळाला लहान व टोकाला जाड, त्रिकोणाकार किंवा ज्याच्या एक बाजूची लांबी समोरील बाजूच्या लांबीपेक्षा फारच लहान असते असा दगड नपुंसकलिंगी असतो. नपुंसकलिंगी दगड पायासाठी वापरतात.

नैसर्गिकरित्या मिळणारे व वाडा बांधकामातील प्रमुख घटक म्हणजे दगड होय. दगड बांधकामाविषयी सांगावयाचे झाल्यास त्याची अत्यंत सोपी व्याख्या दिली जाईल. बलदंड शत्रूचे आक्रमण रोखण्यासाठी उभारलेला अडथळा. ऊन, वारा, पाऊस व इतर कारणांनी कण सुटे होऊन दगडाची झीज होण्याचे प्रमाण फारच कमी असते. त्यामुळे बांधकामासाठी फार पूर्वीपासून दगडाची निवड आपल्या पूर्वजांनी केलेली आहे. आत्ताच्या सारखं वापरा आणि फेकून द्या असं नाही.

**क्रमश :**

# सरकारी योजना/नोकरी

## "मागेल त्याला शेततळे"

**राज्यातील पर्जन्यावर आधारित कोरडवाहू शेतीसाठी पाणलोट व जलसंवर्धन माध्यमातून जलसिंचनाची उपलब्धता वाढविणे तसेच संरक्षित व शाश्वत सिंचनाची सुविधा निर्माण करण्यासाठी मागेल त्याला शेततळे " ही योजना जाहीर केली.**

**इच्छुक शेतकऱ्यांचे विहित नुमन्यातील अर्ज तथा संमती या योजनेत भाग घेण्यासाठी अनिवार्य आहे.**

- **याबाबत शेतकऱ्यांनी त्यांची मागणी ऑनलाईन संगणकीय प्रणालीद्वारे भरावयाची आह**
- **या संकेतस्थळावरुन अर्जाचा नमुना प्रपत्र-2 इच्छुक लाभार्थ्यांनी डाऊनलोड करुन घ्यावेत.**
- **ऑनलाईन अर्जाची पावती इच्छुक लाभार्थ्यांनी डाउनलोड करुन स्वत:कडे ठेवावी.**
- **ऑनलाईन अर्ज अपलोड करण्याची प्रक्रिया संकेतस्थळावर उपलब्ध राहिल.**
- **या योजनेअंतर्गत अर्ज करणाऱ्या व्यक्तीने "आपले सरकार" या संकेतस्थळावर जाऊन मागेल त्याचा शेततळे या लिंकवर क्लिक करावे.**

**त्यानंतर अर्जदारास पुढील तीन पर्याय उपलब्ध राहतील.**

**I) यापुर्वीच तयार केलेल्या प्रोफाईलचा वापर करणे किंवा**
**प्रोफाईल उपलब्ध नसल्यास नव्याने प्रोफाईल तयार क**
**2) कोणत्याही महा ई सेवा केंद्रामार्फत सीएससीमध्ये प्रथम प्रोफाईलसाठी स्वत:चा मोबाईल क्रमांक असणे आवश्यक आहे.**
**3) अर्जदार स्वत:च्या अथवा सायबर कॅफेतील संगणकाचा वापर करुन अर्ज भरु शकतो.**
**4) अर्जासाठी सेवा शुल्क 20 रुपये अधिक सेवाकर लागू राहिल. अर्जदाराकडे मोबाईल क्रमांक नसल्यास महा ई सेवा केंद्रातून अर्ज भरत असताना ही प्रक्रिया महा ई सेवा केंद्र चालकामार्फत करावी.**

### शेततळे कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी अटी व शर्ती पुढील प्रमाणे लागू राहतील.

**लाभार्थी पात्रता**

- **शेतकऱ्याकडे त्याच्या नावावर कमितकती 0.60 हेक्टर जमीन असावी. यात कमाल मर्यादा नाही.**
- **लाभार्थी शेतकऱ्याची जमीन शेततळ्याकरीता तांत्रिकदृष्ट्या पात्र असणे आवश्यक राहिल.**
- **यापूर्वी अर्जदारांनी शेततळे, सामुदायिक शेततळे शासकीय योजनांमधून लाभ घेतलेला नसावा.**

**लाभार्थी निवड**

**१. दारिद्र्य रेषेखालील (बीपीएल) शेतकरी व ज्या कुटुंबामध्ये आत्महत्या झालेली आहे त्यांच्या वारसांना निवड प्रक्रियेमध्ये ज्येष्ठता यादीत सूट देऊन प्रथम प्राधान्याने त्यांची निवड करण्यात येईल.**
**२. या व्यतिरिक्त इतर सर्व प्रवर्गातील शेततळे मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांची ज्येष्ठता यादीनुसार प्रथम अर्ज सादर करणाऱ्यास प्रथम प्राधान्य याप्रमाणे या योजनेअंतर्गत निवड करण्यात येईल**

## नवनिर्माण शिक्षण संस्था, रत्नागिरी भरती २०२४.

**नवनिर्माण शिक्षण संस्था, रत्नागिरी भरती २०२४.**

- पदाचे नाव: सहाय्यक शिक्षक, PRT, TGT आणि PGT.
- नोकरी ठिकाण: रत्नागिरी.
- अर्ज करण्याची पद्धत: ऑफलाईन.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: 8 दिवसांच्या आत.
- अर्ज सादर करण्याचा पत्ता:
- अध्यक्ष, नवनिर्माण शिक्षण संस्था एस.एम.जोशी विद्यानिकेतन, पी-६३, एमआयडीसी, मिरजोळे, रत्नागिरी – ४१५६३९.

- अधिकृत वेबसाईट)
- https://www.navnirmanhigh.in/

शैक्षणिक पात्रता-

| Sr.No. | Subject | Post | Essential Qualification |
|---|---|---|---|
| 1 | Pre – Primary | Teacher & Assis. Teacher | HSC with Montessori Course |
| 2 | Primary | PRT | HSC D.Ed. |
| 3 | English | TGT / PGT | B.A. / M.A. B.Ed |
| 4 | Social Science | TGT / PGT | |
| 5 | Maths | TGT / PGT | B.Sc. /M. Sc. B.Ed. |
| 6 | PT ( Physical Education ) | TGT / PGT | B.A. / M.A. B.P.Ed/ M.P.Ed. |
| 7 | Computer | TGT / PGT | Diploma in Computer, B. Sc\ M Sc. IT, BCA |

**जाहिरात प्रसिद्ध झाल्या चा दिनांक - 5th April 2024**

**जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून (Starting Date For Offline Application) 8 दिवसांच्या आत त्यांनतर आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.**

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ऍड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक-विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क:rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क:sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ए ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862



# दातृत्व

राधाकिसन देवरे,
कोपरगाव- अहमदनगर

**देणाऱ्याने देत जावे**
**घेणाऱ्याने घेत जावे**
**घेता घेता एक दिवस**
**देणाऱ्याचे हात घ्यावे!**


ज्येष्ठ कवी विं. दा. करंदीकर यांचे हे काव्य माणसाच्या दातृत्वाबरोबरच निखळ कळवळ्याचे दर्शन घडविते. देणारा ज्यावेळी काही देतो त्यावेळी त्याचे हात घ्यावे याचा अर्थ देणाऱ्याच्या अंतःकरणामध्ये दातृत्वाचे जे भाव आहेत ते घेणाऱ्याने घ्यावेत.. इथे देणाराही माणूस आणि घेणाराही माणूसच.. पण दोघांत श्रीमंत आणि गरीब अशा दोन सीमारेषा आखल्या गेलेल्या अहेत. या दोन्ही सीमारेषांमधून वाहत येणारा दातृत्वाचा आणि चांगूलपणाचा प्रवाह अलिकडच्या दोन - तीन दशकापासून आटत चालल्याचे जाणवते. मागे डोकावून बघताना तीस - चाळीस वर्षापूर्वी माणसाकडे पैसा नव्हता परंतु जे काही जवळ होते त्यातले इतरांना देण्याची भावना मात्र मनोमन भरलेली होती. सद्या इतरांना काही देण्याऐवजी घेण्याचीच वृत्ती वाढत चालली आहे. कमी श्रमात अधिक मिळविण्याच्या हव्यासापायी दातृत्व तर सोडाच परंतु परस्परांमधला संवाद, आदरभाव, चांगुलपणा, वात्सल्य, प्रेम माणूस हरवत चालला आहे. संस्कारापासून माणूस दुरावत चालला आहे. नव्या तंत्रज्ञानाच्या कक्षा जसजशा विस्तारत चालल्या आहेत तसतसा माणूस देखील त्यात खोलवर रुतत चालला आहे. सभोवतालची नाती गोती, आपुलकी, प्रेम, माया या गोष्टी त्याच्या दृष्टीआड होत चालल्या आहेत. खरेतर त्याच्या माणूस म्हणून जगण्याच्या ऱ्हासाला हीच कारणे कारणीभूत ठरत आहेत.

माणूस म्हणून जगायचे असेल तर दातृत्व, कर्तृत्व, नेतृत्व, व्यक्तीत्व आणि स्वातंत्र्य या पंचसूत्रींचा संगम माणसाजवळ असावा. संगमावर अनेक नद्या एकत्र येवून मिळाव्यात आणि तेथून पुढचा प्रवाह विशाल, वेगवान होत जावा अगदी तसाच माणसांच्याही आचार विचारांचा, वागण्याचा, बोलण्याचा प्रवाह विशाल आणि वेगवान होत जावा अशी अपेक्षा उरतेच. अलिकडे संस्कार करणाऱ्या माणसांपेक्षा उपदेश करणाऱ्या माणसांची संख्या अधिक वाढत चालली आहे. उपदेश जरुर करावा, पण तो करण्याईतकी पात्रता माणसाजवळ असायला हवी. माणसाने दातृत्वाचे कर्तव्य निभावताना त्या कारुण्याचा दातृत्वाला सुगंध असावा.. आपलेपणाचे माधुर्य असावे.. समर्पणाचे प्रामाणिक भाव असावेत. या सहज करता येणाऱ्या गोष्टी माणसाने लक्षात घ्यायला हव्यात. तरच त्याच्या दातृत्वाला मूल्य आहे. माणसाने आपल्या जवळील ज्ञानाचा, प्रेमाचा आणि संपत्तीचा संचय आवश्य करावा, कारण जगण्यासाठी या गोष्टींची आवश्यकता असतेच. परंतु यातले काही इतरांना देता आले तर देणाऱ्याच्या हाताला पावित्र्य येते.. त्याच्या जगण्याचेही सार्थक होते. कारण इतरांना देण्याने आपल्याजवळच्या ज्ञानात, प्रेमात आणि संपत्तीत अधिक भर पडत जाते.

मधमाशांना अल्पायुष्य लाभलेले असते. परंतु फुलां फुलांवरचा मकरंद गोळा करुन त्याचा त्या संचय करुन ठेवतात. त्यांना हेही माहीत असते की, एक दिवस माणूस हा सारा मकरंद काढून नेणार आहे. तरीही त्या आपले काम थांबवीत नाहीत. कारण समर्पणाची अनमोल अशी देणगी निसर्गाने त्यांना बहाल केलेली आहे. यालाच तर खरे जगणे म्हणतात..

**माणसाकडे बुध्दी आहे, विवेक आहे, मन आहे, वात्सल्य आहे, ममता आहे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे चांगले वाईट शोधण्याची दृष्टी आहे. मग मधमाशांसारखे एकदा तरी आपण जगून पाहावे.. ओंजळभर दिले तर आभाळभर मिळते. पावसाने माती ओली झाली की, मातीतून चैतन्य फुलते.. या देण्या घेण्यातला आनंद माणसाला शोधता आला पाहिजे. तरच जगण्याला चैतन्य येईल...**






# आव्शीसाठी.



वयल्यांचा कवग्या,
मालवण- सिंधुदुर्ग.

.. बाळाकाकांची गजाल. बाळाकाका लगीन न्हावन तशी लय वरसा झाली. बाळाकाका एक एक नाय, तर दोन दोनदा लगीन न्हाले. बाळाकाकांचा पयला लगीन कधी आमच्या जल्माआधीच झाला वाटता. पयल्या बायकोपासून बाळाकाकांक दोन झील. धाकटो साधारण हायस्कूलात नि थोरलो कॉलेजात शिकत आसतना एके दिवशी बाळाकाकांची पयली बायको ह्या जग सोडून गेली. फटकी इली व्हरान त्या, कामनीचा निमित्त झाला नि ती बाय अंथरुणावरून काय उठली नाय. बायकोक निरोप देतना बाळाकाका लय रडले. लय म्हणजे काय, अख्ख्या घर डोक्यार घेतल्यानी. आमी तेव्हा ल्हान. पण वाडीत कोण मेला काय आव्शीच्या पदराआड लपान लपान मयत बघूक जायची. बायकोक खांदेकऱ्यानी उचलल्यानी तेव्हा तर बाळाकाकांनी आकांत केल्यानी. 'न्हेव नको तिका मसवटेत. रवांदे हयच घरात. तिका बघून मी एकेक दिस ढकलीन.' मग बब्यादाजी फुडे झाले. बाळाकाकांक थावरीत म्हणाले, असो अनैसर्गिक हट्ट करू नको. जा होव्चा ता झाला. वयनी तुका दोन तांदळासारे पॉर देव्न गेली हा. त्येंचो संभाळ कर. तिका जाव्दे तिच्या वाटेन.' बाळाकाकांच्या आव्शीकडे बघीत बब्याकाका म्हणाले, आव्स बघ बिचारी कशी मेटकुळा मारून बसलीहा. आव्शीकडे बघून तरी आवंढे गीळ.'

दिसमास गेले तशे बाळाकाका बायकोच्या दुःखातना सावारले. झीलांक आव्शीच्या स्वाधीन करून मुंबैच्या चाकरेत रमले. कधी गावाक इले काय, मधीच कोणतरी विषय काढी,' बाळा, बघ खयतरी सुमाराकसा आयदान कोण गावता काय बघ. आजून वय नाय गेला तुझा.' पण बाळाकाका विषय बदलून फक्त हसायचे. एके दिवशी गावाक इल्यार बाळाकाका सकाळीच आमच्या बाबांक भेटाक इले. ' सावंतानी सोरगत आणल्यानी हा. एक निमी बाई हा वरवड्यात. कधी जावया बोलणी करूक?' माझ्या बाबांक कमाल वाटली. कालपर्यंत लग्नाचो विषय काढलो की झुगरावणारे बाळाकाका आज लगीन करूक तयार! 'अरे, पण तू लगीन करूक तयार नाय ना? मग...' बाबांनी विचारल्यानी. बाळाकाका बाबांक समजावीत म्हणाले,' माझो विचारच नाय हुतो. खरा म्हणशात तर माझा आजय मन नाय लग्नाचा. पण ह्या वयात आव्शीचे हाल बघवत नायत. दोन दुडी पाणी भरतना तीका दम लागता. कसा होतंला फुडे? तेव्हा आव्शीक आधार, पोरांक आधार म्हणान लग्नाचा येवजतय.' शेवटी भावकेच्या कानार विषय गेलो. लग्नाची बोलणी झाली. देणा-घेणा ठरला नि चांगल्या मुहूर्तावर बाळाकाका दुसऱ्यांदा लगीन न्हाले!

बाळाकाकांची दुसरी बायको काय तशी साधीभोळी नाय. बाळाकाका तिका आव्शीच्या स्वाधीन करून मुंबैत चाकरेक गेले खरे, पण ह्या बाईचा मन काय गावात रमना. कशीबशी दोन वरसा काडून गुदस्ता ही बाई गावातला सगळा गुंडाळून बाळाकाकांबरोबर मुंबैत गेली. बाळाकाकांनी पण तिका परत गावाक पाठवचो विचार नाय केल्यानी. आता दोघांचो संसार मुंबैत मस्त चललोहा. चुकान कधी गावाक इले काय आजय बाळाकाका माझ्या बाबांक भेटाक येतत. बाबा मुद्दाम विचारतंत, बाळा, दुसरा लगीन केलस ता बरा केलंस. आव्शीक तरी पाणयाक आधार केलंस.' ह्येच्यार बाळाकाका काय बोलतले? काय उत्तर देतले? फक्त गालातल्या खालात हसतत. मग बाबा म्हणतत, बायकोन तुझी तैनात बरी ठेवल्यानहा. आधी बसलले गाल आता चांगलेच वर इलेहत. आता बाळाकाकांचे दोनय झील मोठे झालेहत. थोरलो आता कणकवलेत खयतरी कामार जाता. धकटो आपलो दिसभर पाणी भरता, कपडे धुता, जेवाण करताहा. नायतरी ही कामा आता करतला कोण? बाळाकाकांच्या आव्शीक काय आता घोपान हा?



## आठवणींच्या गोष्टी

राष्ट्रपाल सावंत,
चिपळूण- रत्नागिरी
मो. ९४०३१४४३५६..

# नवसाचं पोर

खाद्या लहान मुलाला कुणी रागावल ओरडल तर ते रडत, रुसत किंवा त्याच्या पद्धतीने ते नाराजी व्यक्त करते, लहान कशाला एखाद्या मोठ्या स्त्री पुरुषाच्या बाबतीतही हे अनुभव पाहायला, ऐकायला मिळतात. तेव्हां मग कुणीतरी बोलतो. अरे बाबा त्याला काही बोलू नकोस तो नवसाचा आहे. कधी कधी एखादया भांडण तंटयात मी तुला बोललो , मग एवढ रागवायची गरज काय? तू काय नवसाचा आहेस काय? असं विचारलं जातं. यातल्या श्रद्धा अंधश्रद्धा हा भाग जरी दूर केला तरी कुणाच्या श्रध्देचा भावनेचा कुणी अनादर करु नये. त्या खोलात कुणी जावू नये. कधी तरी बोला फुलाची गाठ पडते आणि अपेक्षित घटना घडते. कुणी आपापल्या रितीने आपले उद्दिष्ट पूर्णत्वास नेतो. यशस्वी होतो.त्याच्या समजुतीने तो नवस असतो. पूर्वापार हे सुरू असले तरी आज परिवर्तन पुरोगामी विचार समाजात रुजत आहेत ही आनंद समाधानाची बाब आहे.

अशीच एक गोष्ट आहे. संत्याची. संत्या म्हणजे संतोष. कुळाच नावं वाढविण्यासाठी जन्माला आला. आईबापासह सर्वांची चिंता मिटली, सर्वांना समाधान झालं म्हणून नावं संतोष ठेवलं. आपल्याला पुत्ररत्न व्हाव यासाठी बापानं सर्वत्र साकडं घातलं शेवटी निसर्ग नियमाने, किंवा त्याच्यात असलेल्या काही शारीरिक व्याधी दूर झाल्याने उतरत्या वयात हे पुत्ररत्न जन्मास आले. त्यावेळी सर्व गावाला जेवणं घातलं. उतारवयात अगदी म्हातारंपणात घरात पाळणा हालला. वंशाला दिवा मिळाला आता आपला वंशवेल बहरत जाईल या आशेनं यान मुलाला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपलं. संत्यान नुसतं भोकाड पसरायची खोटी त्यानं मागितलेली वस्तू, खाऊ काही वेळात त्याच्या पुढ्यात ठेवली जायची. मग हे महाशय खुश. कुणाच्या तरी शब्दान आशीर्वादाने आपली इच्छा पूर्ण झाली. ही श्रद्धा की अंधश्रद्धा बापानं जपली. याचा दुष्परिणाम इतका भयाण झाला की पोरगं हाताच्या बाहेर गेलं. त्यानं सर्वांचं पाणी जोखल. आपणं कसही वागलो, काहीही केलं तरी आपल कुणी काहीच करू शकणारं नाही ही सांत्याची मानसिकता तयार झाली. हळूहळू छोटा असून सर्व मोठ्याची सुत्र त्यानं आपल्या हातात घेतली. आणि सर्वांना हे पोरग आपला धाक दाखवू लागले.

सक्तीनुसार संत्याला शाळेत दाखल केला पणं शिक्षकांना अटी शर्ती घालून . शिक्षकही नियमाचे पालन करणारे जर पालकच माझ्या मुलाला काही बोलू, रागावू, मारू नका सांगतात तेव्हां शिक्षकही आपली भूमिका सौम्य घेतात. उगाचच हात दाखवून अवलक्षण काढला करून घ्या. त्यांनीही मग याच्या वागण्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले. उगाचच वादविवाद कशाला? तांदळात एखादा खडा असतोच, सगळीच पोरं हुशार कुठं असतात. दहा बारा जणात एक अप्रगत राहिला तर तेव्हां फारशी दाद फिर्याद कुठं घेतली जात होती. शंभर टक्के निकालाची प्रथा नव्हतीच. पुन्हा उजळणी, पाया मजबूत होण्यासाठी त्याचं वर्गात एक दोन वर्ष ठेवलं तरी पालक अधिकारी कुणीच बोलत नव्हतं. संत्यांच्या गुणामुळे तो एका एका वर्गात एक दोन वर्ष बसत होता. नाय पुढं शिकला तर हाय शेतीवाडी कसेल नी खाईल. आतासारख्या तेव्हां फार मोठ्या कुणाच्याही अपेक्षा नसायच्या.



संत्यान सहावीतच शाळा सोडली . शाळा सोडली तेव्हां त्याला चांगलं मिसरूड आलेलं होत. शाळा नाही काम नाही, ऐन तारुण्यात येताच त्याला कोणतंही व्यसन वर्ज्य नव्हता. धूम्रपान, मद्यपान , मटका जुगारात तो कधी कसा गुरफटला ते घरच्यांना सोडा. त्यालाही कळलं नाही. आईच्या बटव्यातले, नी बापाच्या खिशातले पैसे तो कसा काढायचा त्याचं त्यालाच ठाव. कुठल्याही मुलीची छेड काढण्यात तो तो मागे पूढे पहात नसे . चुक यांन करायची नी आई बापानं हात जोडून माफी मागायची हे नित्याच झालं. असून अडचण नसून खोळंबा अशी घरच्यांची परिस्थिती झाली. दिवा अंधार दूर करतो प्रकाश देतो पण हा पुत्ररुपी वंशाचा दिवा प्रकाशित न होता काळोखाच साम्राज्य पसरवीत होता.बापानं राखलेल कमविलेल हा एक मार्गी संपवित होता. दिवसे दिवस एक एक वस्तू, जमीन हा विकत होता. जबरदस्तीने बापाकडून हक्कसोड पत्र घेऊन सर्वत्र वारस म्हणून आपली नोंद करून घेतली त्यामुळं त्याला रान मोकळ होत.

"नवसाच पोरं नी जीवाला घोरं"लोक दबक्या स्वरात बोलू लागले, बापाची मानसिक कुचंबणा झाली. आई बाप असह्ययतेने मुलाला हात जोडत. आई बाप पंच्याहत्तरीकडे झूकलेले नी पोरगं पंचविशीकडे पन्नास वर्षात राखलेले पोरान दहा बारा वर्षातच संपविले. अती लाडान पोरान संसाराची माती केली. हात जोडून तू तुझ वागणं सोड असं जन्मदाते पदोपदी त्याला सांगत होते.वेळ निघून गेली होती. हाती काहीच नव्हत, हे सारं बघून जवळचे नातेवाईक, गावातील लोक हळहळत होते. अरे पोरं नसणारी कैक सुखाने जगतात, यान वारसा हवा म्हणून जो सांगेल तो मार्ग पत्करला आणि जन्मास आलेला हा दिवा आज जन्मदात्यांना छळतो आहे. यात दोष कुणाचा याचं मूल्यमापन करतांना लोक म्हणत होते. जन्मास आला पणं बापाला काळ झाला. अती लाडानेच पोरं वाया गेला

## साप्ताहिक सदर समुपदेशन

अमरनाथ परब
9833606655



# अर्थ त्रिकोण

पत्रिकेनुसार कोणत्या क्षेत्रातून अर्थप्राप्ती होईल ? याचा विचार करून शिक्षण घेणे अधिक योग्य असते. व्यवसाय कोणता करावा ? कोणत्या व्यवसायातून अधिक पैसा मिळेल ? यासाठी पत्रिकेतील अर्थ त्रिकोण म्हणजे २, ६ आणि १० ही स्थाने. तसेच या राशीतील ग्रहस्थिती व्यवसायाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. "दशम स्थान" हे अर्थ त्रिकोणातील एक महत्वाचे स्थान आहे.

१) संपत्तीकारक शुक्र ग्रह.
२) दैवी पाठबळ लाभण्यासाठी गुरु ग्रह.
३) आत्मिक समाधान आणि राजाश्रय प्राप्त होण्यासाठी रवि ग्रह.
४) मानसिक समाधानासाठी चंद्र ग्रह.
५) करिअरमध्ये प्रगती होण्यासाठी शनि ग्रह.
६) बौद्धिक निर्णयासाठी बुध.
हे सर्व ग्रह शुभ आणि बलवान असणे आवश्यक आहे.

१) प्रथम स्थानात दशमेश असल्यास नवीन व्यवसायात स्वप्रयत्नाने, स्वकष्टाने प्रगती आणि वृद्धी होते. एखाद्या संस्थानिर्मितीचे कार्य हातून घडू शकते.

२) द्वितीय स्थानात दशमेश असल्यास वडिलार्जित व्यवसायात, हॉटेल व्यवसायात किंवा घरगुती खानावळीत यश मिळते.

३) तृतीय स्थानात दशमेश असल्यास लेखन, वक्तृत्व, प्रवास या माध्यमांतून यश मिळते.

४) चतुर्थ स्थानात दशमेश असल्यास शेती, वाहन, मालमत्ता, भूमी यांसंदर्भातील व्यवसायात यश मिळते.

५) पंचम स्थानात दशमेश असल्यास शैक्षणिक क्षेत्र, प्रकाशक, एजंट इत्यादी व्यवसायांतून यश मिळते.

६) षष्ठ स्थानात दशमेश असल्यास निसर्गोपचार तज्ञ, सल्लागार इत्यादी व्यवसायांत यश मिळते.

७) सप्तम स्थानात दशमेश असल्यास घरगुती व्यवसाय, साथीदाराच्या सहवासाने भागीदारीत व्यवसायामध्ये यश मिळते.

८) अष्टम स्थानात दशमेश असल्यास व्यवसायात मंद गतीने प्रगती होते. मृत्यूसाठी लागणारे सामान विक्रेते किंवा विमा एजंट यांना यश मिळते.

९) नवम स्थानात दशमेश असल्यास व्यवसायात उत्तरोत्तर वाढ होते. स्वतंत्र व्यवसायात यश मिळते. अध्यात्मासंबंधित व्यवसायात यश मिळते.

१०) दशमेश दशमात असल्यास व्यवसायात मनाप्रमाणे यश मिळते. ज्योतिषशास्त्रात यश मिळते. दशम स्थानाचा जो स्वामी असेल, त्या संबंधित व्यवसायात अधिक यश मिळते.

११) एकादश स्थानात म्हणजे लाभ स्थानात दशमेश असल्यास मित्रांच्या साहाय्याने व्यवसायात यश मिळते. मास मिडिया, संगणक इत्यादी संबंधित व्यवसायात यश मिळते.

१२) व्यय स्थानात, म्हणजे बाराव्या स्थानात दशमेश असल्यास प्रवास, धर्मदाय संस्था, रुग्णालय यांसंबंधित व्यवसायात यश मिळते.

कुंडलीतील भाग्य स्थान महत्त्वाचे स्थान आहे. दशम स्थानाचे ते व्यय स्थान आहे. व्यवसायातून होणारी हानी दर्शवणारे हे स्थान आहे. हे स्थान बलवान नसल्यास व्यक्तीला व्यवसायात हानी संभवते.

लग्न स्थान किंवा लग्नेश दूषित असेल, तर व्यक्ती स्वत: प्रयत्न करण्यास न्यून (कमी) पडते. लग्न स्थान हे दशम स्थानाचे चतुर्थ स्थान, म्हणजे सुख स्थान आहे.

पंचम स्थान हे दशम स्थानाचे अष्टम स्थान आहे. हे स्थान बलवान नसल्यास व्यक्तीला निवडलेल्या व्यवसायातून मानसिक समाधान मिळत नाही.

दशमेश म्हणजे दशम स्थानाचा स्वामी ६, ८ किंवा १२ या त्रिकस्थानात असेल, तर व्यवसायात संघर्ष होतो.



# आंब्यांच सासव



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

**उन्हाळा सुरु झाला कि चाहूल लागते आंब्याच्या मोसमात आमच्याकडे (आईकडे )बरेचदा होणारा हा पदार्थ. आज आपण तीच करायला शिकूया म्हणजे या उन्हाळ्यात सर्व पदार्थांची मस्त चव घेता येईल**

**साहित्य -**


- **५-६ रायवळ आंबे (पायरीही चालतील),**
- **पाव वाटी ओले खोबरे,**
- **१ -१.५ लहान चमचा तिखट,**
- **मीठ,**
- **गूळ**
- **मोहरी.**

**कृती -**

- आंब्यांचा रस काढून घ्यावा.
- त्यांच्या बाठी टाकू नये.
- चमच्यानी रस सारखा करून घ्यावा.
- रसाच्या गाठी मोडून घ्याव्या.
- अर्धा ते पाऊण चमचा मोहरी कढईमधे कोरडी भाजावी.
- ओले खोबरे आणि भाजलेली मोहरी पाणी घालून वाटावी.
- आंब्याच्या रसात तिखट,हळद अणि गूळ घालावे.
- मीठ घालून हे वाटण घालावे.बाजूला काढून ठेवलेले बाठे त्या मिश्रणात घालाव्या.
- गॅसवर ठेऊन एक उकळी काढावी. एक मोठा चमचा पाणी घालून मिश्रण सारखे करावे.

गरमगरम सासव खायला तयार.!





## आठवणीतील व्यक्तिमत्वे



श्री धनंजय शेटये.
गोळवण, ता.मालवण
मोबाईल.
९६१९२२२७०९

# 'नानांचा 'गुढी'पुराण'

" धनग्या मेलग्या गुढी पाडवो कदी आसा रे?"
नाना थोडेसे रागातच बोलत होते.नाना आवेशात पण प्रेमाने आदेशवजा हाक मारतात.
"इतक्या माझ्या लक्षात नाया नानानु, पण पुढच्या आठवड्यात आसा इतक्या खरा..." मी कामात होतो पण विषय टाळायचं म्हणून काहीतरी बोललो.नाना एकदम माझ्याव चिडलेच.
"ता माकाव म्हायती हा रे!! पण गुढी पाडयो खेका साजरो करतत ता तरी म्हायत हा काय रे तुका ?"
"नानानू सांगशात तर बरा होयत. तुमच्यासारख्या जाणत्या माणसाकडसून बरीच म्हायती गावता...".
" आयक तर..... गूढयेक चिव्याची काठी लागता.चियाच्या काठयेक लय मान आसता. गुढयेक चीवोच म्हत्वाचो."
निसर्गचं नव्या नवलाईने नटलेला असतो. झाडावेलींना नवी पालवी फुटलेली असते. निसर्ग नव्याने नवी सुरूवात करत असतो. म्हणून नववर्षाचा आरंभ गुढीपाडव्याच्या दिवशी साजरा होत असतो. कारण सर्व सण उत्सव हे निसर्गावर अवलंबून आहेत.

ब्रम्हदेवाने चैत्र शुद्ध प्रतिपदेदीवशी ही सगळी सृष्टी निर्माण केली आणि आनंदोत्सव साजरा करण्यासाठी ब्रम्हध्वज(गुढी) उभी केली होती असं काही काही लोकांचं म्हणनं आहे. तसच गुढी पाडव्याच्या दिवशी प्रभू रामाचा राज्याभिषेक होता. तेव्हा पासुन हा गुढीपाडव्याचा सण सुरु झाला असावा.

मराठी ,कोकणी माणसाचे नव्या वर्षाच्या सुरवातीचा सण म्हणजे 'गुढी पाडवा'. लांबलचक मोठा चिवारणीचा ( बांबू) सकाळीच कोयत्याने तोडून आणावयाचा. बांबूवरील गुंजकं तासून ठेवायची. भलीभक्कम अशी उंचीची गुढी बनवनं ही गाववल्याची ईभ्रत समाजली जाते. गुढीसाठी आतुन भरीव चीवा लागतो. पोकळ चिवारणीची गुढी बनवायची नसते. गुढीचा चीवा हा पायाने ओलांडता नये. अस केल्यास वाईट प्रसंग, संकटे येतात अशी लोकांची समज आहे. गुढीला देव मानलं जाते. गुढी पाडव्यापासुनच भावकीतल्या वर्सलीची सुद्धा सुरुवात होते .वर्सल केलेल्या घरातलो जो भाव गुढी उभी करतो तो गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर पुढे वर्षभर काजू, आंबा, रतांबा, फणस अशी झाडापेडाची उत्पन्नं स्वत:साठी घेतो आणि पुढे वर्षभर येणा-या सणाची जबाबदारी ही त्याच्या खांद्यावर असते. ज्या घरात गुढी असते त्या घरात भाद्रपद शुद्ध चतुर्थीला गणपती बसवला जातो.

गुढीपाडव्याच्या सणाला गुढीला पांढ-या चाफ्याच्या फुलांचा हार घालवा लागतो. तांब्याचा तांब्या गडुसारखा बांबूच्या टोकावर उलटा करुन बांधायचा. साखरेचं गाठले(साखरेची मिठाईचा हार) लोंबतं सोडायचं. तांब्याच्या तांब्याला चुलीतल्या राखेने आणि कोकम लावून चकचकीत घासून मग त्यावर हळदीत चुना मिसळून करुन साधारणतः नारिंगी रंगाचे पट काढायचे. चिवारणीच्या चिव्याच्या बांबूला कलाबुतीचे कापड बांधायचे. त्यावर हा तांब्याचा गडु आणि चाफ्याच्या फुलांचा हार आणि गाठलं मन वेधून घेतं. खळयात पाट ठेवंण त्या पाटावर हा गुढीचा चीवा पडवीतल्या खांबाकडचे दोनचार नळे उतरवून उभा करायचा आणि काथ्याच्या आटीच्या दोरानी बांधायची. समई, अगरबत्ती, धुप असं सगळं घेवून यथासांग गुढीची पुजा करायची. पंचपक्वानाचो गुढीला नैवेद्य दाखवायचा. मनातल्या आशा आकांक्षा, मुलाबाळांचा नोकरीधंदा, मिळकत गुढीच्या उंचीसारखी वाढावी, मोठी होऊ दे याच्यासाठी गुढीकडे खणखणीत गा-हाणे घातला जाते.

गुढी पाडयाच्या सणाला एक दिवस का असेना पण चाकरमानी हा वेळात वेळ काढुन गावाला हा येणारच.कारण गुढी उभी केल्याशिवाय गणेश चतुर्थीला घरात गणपती बसवनं म्हणजे अशुभ समजलं जातं. त्यामुळे गुढीला मोठा मान असतो. गुढीपाडव्याचा दिवस हा सगळ्यात शुभ दिवस समाजला जातो.

राजा शालिवाहनाने शकांचा पराभव करुन नवी कालगणना सुरवात केली. म्हणून हा गुढीपाडवाच्या नववर्षारंभाच्याच्या दिवसापासुन मराठी कालगणना सुरु झाली. मनामनातली भांडणं दूर करुन आपापसात एक मैत्रीचं अनोखं नातं गुढीच्या उंचीसारखं वाढीसाठी हा सण साजरा केलो जातो. सकाळी साडे अकरा बारा वाजता उभी केलली गुढी संध्याकाळी पाच-सह वाजता उतरवली जाते. गुढीपाडयादिवशी गावाभर बहुतांश घरी लाऊडस्पीकर वर प्रल्हाद शिंदे, अजित कडकडे यांची गाणी वाजत असतात. वातावरण एकदम मोहुन टाकणारं असतं.
" नानानू लय भारी आणि महत्वाची म्हायती सांगलास. आता ही म्हायती माज्याकडसून पुढच्या पिढीकडे संक्रमित होतली.



## गारवो

झाडां गेली पेडां गेली
गारवो खयचो आता?
सगळा झाला भणभणीत
उकाड्यान जीव जाता...

झाडां हुती पेडां हुती
रानां वनां डुलां हुती
पाणी हुता गारवों हुतो
गुरांढोरां फिरां हुती...

माणूस झालो हावरो
सगळा खाय्त सुटलो
माणूस नाय ऱ्हवलो तो
माणसातनां तो उठलो...

डोंगर झाले उजाड आता
पावला पावलार बावडें पडले
जो तो म्हणतां आणखी होया
नदी नाले कोरडे पडले...

सूर्यदेव ओकता आग
हुलपान हुलपान मराक होतां
गारवों काय घेव्न बसलास
घामान आंग चिंब होतां...

गारव्याचे दिस गेले
सावळी खय दिसतां बघा
पायार धोंडो घेतलास मारुन
आता कर्माची फळां भोगा...!

**बाबू घाडीगांवकर, सिंधुदुर्ग**

## काव्यांगण

### गारवा

तुझ्या आठवांची अशी लाख स्पंदने
रुणझुणत्या रेशमी पावलांनी चालणे
कधी तू अन कधी मी हे हरवत जाणे
जसे वाळवंटातही गारवा लाभणे

प्राक्तनाच्या हिंदोळ्यावर अलगद झोके घे
रणरणत्या उन्हात ही चांदणे पांघर
तू चंद्र अन मी चांदणी होउनी जगणे
जसे वाळवंटातही गारवा लाभणे

शब्दांच्या भेटी अन शब्दांच्या गाठी
शब्दांचीच मग ती निरागस मिठी
अबोल प्रीतीला अबोल हे उखाणे
जसा धुक्यातही गारवा लाभणे

नवलाईचा , नव चैतन्याचा ,
तुझ्या माझ्या त्या रेशिमगाठीचा
कधी अचानक ,कधी अकल्पित,
हवाहवासा , परी गारवा लाभणे

**सौ . स्मिता कशाळीकर, सिंधुदुर्ग**

## मालवणी हास्यसम्राट बाबुजी

भारत स्वतंत्र होऊच्या आधी
मालवणी हास्यसम्राट जन्माक ईले,
सिंधुदुर्गात मालवणच्या रेवंडी गावात
मालवणी भाषेचे दूत अवतरले..

मच्छिंद्र कांबळी ह्या नावान
मालवणी मुलखात नामकरण झाले,
भद्रकाली प्रॉडक्शनच्या साथीन
मालवणी भाषेक सुगीचे दिस ईले..

'चाकरमानी' प्रेमान गावात येऊन
'पांडगो ईलो रे'ची साद कानार पडली,
'केला तुका झाला माका' म्हणत
'येवा कोकण आपलोच असा' काळजात जागा केली..

'भैया हाथ पाय पसरी' पर्यात
तात्या सरपंच 'वस्त्रहरण' करून मोकळे झाले,
'घास रे रामा' करता करता
'माझा पती छत्रपती' अश्या विनोदान प्रेक्षक न्हाले..

प्रसादच्या साथीन वस्त्रहरण
नाटकान पाच हजार प्रयोग हाऊसफुल दिले,
भारताबाहेर लंडनच्या धरतीवर
मालवणी भाषेचो झेंडो अटकेपार घेऊन गेले..

मालवणी गाळीये घालून हसवता हसवता
'वय वर्ष पंचावन्न' आनंदान पुरे केले,
चेहऱ्यावर हास्य पण, डोळ्यात आसवा देऊन
बाबूजी मालवणी जगवून अनंतात विलीन झाले...

**सौ. अश्विनी मंगेश परब,**
**ठाकुर्ली, ठाणे**

## तिच्या' नजरेतून 'ती'

(**पान ३ वरून**)

आमचं प्रोजेक्ट संपलं. पुढे रचना मला भेटणं शक्यता नव्हती. मी वसईला ती नवी मुंबई. पण एका सकाळी फोन आला. मी ऑफिस च्या गडबडीत होते. पण रचना चा आहे म्हणून मी लगेच उचलला. म्हणाली 'आज संध्याकाळी नरिमन पॉईंटला भेटाल का?'
मी तात्काळ हो म्हटलं.
आली तीच मुळी रडायला लागली.
'अगं काय झालं?'
'ताई.. सगळं संपलं. मी कोलकत्ताला सरप्राईज व्हिजिट जायचं ठरवलं. इकडे पण काही कळू दिलं नाही...कारण आता मला थोडी थोडी बंगाली भाषा समजू लागली होती. त्यांच्या बोलण्यात सारखं सुभाषिणी हे नांव आणि सुकुमार चं नांव यायचं.तर...तर तिकडे ह्या दोघांचा चांगला संसार चालला होता. मी गेले तर सुकुमार तिला किचन मध्ये मदत करत होता. मच्छी तळून दे, ती हसत हसत त्याला चेहऱ्यावर आलेले केस बाजूला करत होता...उघड्या दारातून मी आले. मी तीव्र स्वरात ओरडले.. सुकुमार थोडा वरमला. मी सरळ हॉटेल गाठलं. रडत सासूला सांगितलं. ती मख्ख बाई म्हणाली "तो बिचारा एकटा असतो तिकडे त्याने उपास का काढावा? ती आमच्याच बिरादारीची मुलगी आहे..."
मी एवढी शिकलेली, वावरलेली पण हया अडाणी समजणाऱ्या लोकांपुढे किती तोकडी पडले बघ. त्या क्षणापासून मी माझ्याच नजरेतून उतरली आहे."

"आता कुठे राहतेस?"
"तू म्हणालीस ते आठवलं आणि तिकडून आल्यावर आई कडे गेले. खरंच त्या तिघांनी मला समजून घेतलं. मी सुकुमारवर फसवणूक, मानहानी, अब्रू नुकसानी असे खूप सारे दावे जेंव्हा दाखल केले. तेंव्हा निर्लज्ज मला घटस्फोट द्यायला तयार झाला."
"घर? ते तुमच्या जॉईन नावावर होतं ना?"
" हो मी त्याचे पैसे घेतले. खरं तर आमचे वकील म्हणाले त्यांना घराबाहेर काढू शकतेस तू, पण मलाच त्या घराच्या भिंतीवर वर मला मिळणाऱ्या वागणुकीची पडछाया दिसली असती. आता मी मावशी कडे जर्मनीला जाणारे. आज तूला थँक्स म्हणायला बोलावलं. तू मला जागं करून आई वडिलांची महती सांगितली नसतीस तर मी त्याच घरात पायपुसणं होऊन राहिले असते."
खरंच कधी कधी मुली कशा बळी पडतात.
**(नांव बदलली...सत्य घटनेवर आधारित.)**

## युद्धात मनुष्य जन्माची सार्थकता

पान ३ वरून)

एखाद्याच्या जुलूमाला, कपटी चालीला सामोरा जाऊन संयमाने सहन करणाऱ्या परमार्थ साधकाला परमेश्वर राग, द्वेष, ईर्षा, सूडभावना, द्वैतभावना यांवर संयम राखण्याचे बळ देत असतो. युद्धप्रसंग मर्यादेच्या बाहेर वाढल्यास त्याच परमार्थ साधकाला आपल्या संयमाचा धनुष्यबाण धारण करून आक्रमक होऊन उठण्याची आज्ञा परमेश्वर देत असतो आणि त्याचबरोबर त्याला प्रेरणा आणि आत्मबळ देत असतो. अशावेळी मात्र समोरच्या अघोऱ्याची धडगत असू शकत नाही.
सांगायचे तात्पर्य एवढेच की, संयमाने परमार्थ साधनेने एखाद्या अधमास, नीचास थोड्या अधिक कालावधीने पूर्णतः पराभूत करता येते. अर्थात युद्धात शांतिनेही लढत देऊन शत्रूचा पराभव साधता येतो. जीवनात प्रपंच करताना युद्धप्रसंग हे येतच असतात. या युद्धात समोर कधी व्यक्ती असते, कधी प्रसंग असतो, कधी स्वतःचे कर्म असते, कधी परिस्थिती असते तर कधी विचार असतो.
प्रपंच साधताना आपण स्वावलंबन तसेच परमार्थ साधून प्रपंच करतो की परावलंबन तसेच स्वार्थ साधून प्रपंच करतो याचा विवेकसापेक्ष विचार व्यक्तीने करावा असा आग्रह आणि त्यासाठीचे मार्गदर्शन चार वेद, उपनिषदे, श्रीमद्भगवद्गीता त्याचप्रमाणे अन्य ग्रंथांतून, साधुसंतांच्या वाग्वाणीतून करण्यात आलेला आहे.
मनुष्य जन्माची सार्थकता परमार्थ साधक होवून साधता येईल की स्वार्थ साधक होऊन साधता येईल? युद्ध पातळीवर जाऊन युद्धातून कोणाला काय साध्य होईल? काय प्राप्त होईल काय गमवावे लागेल? जे साध्य होईल ते धर्मफल असेल की अधर्मफल? हे मानवासमोरचे साधे, सोपे प्रश्न नव्हेत तर परम चिंतनाचे मुद्दे आहेत. या मुद्द्यांच्या चिंतनातूनच युद्धातील मनुष्य जन्माच्या सार्थकतेचा दुवा अथवा मार्ग प्रबोधित होणारा आहे; उमजणारा आहे.
एकमेकां लुटत राहु। अवघे धरू स्वार्थपंथ।। या अविचाराचा नाद न होता एकमेकां साह्य करू। अवघे धरू परमार्थपंथ।। या सुविचाराची नांदी व्हावी.

श्री कलार्पणमस्तु।

## शालेय अभ्यासक्रमात छत्रपती संभाजी महाराज शिकवले जावेत !



**सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

फाल्गुन अमावस्या म्हणजेच छत्रपती संभाजी महाराजांचा बलिदानदिन. धर्मरक्षणासाठी मृत्यूलाही हसत कवटाळणारा असा युगपुरुष महाराष्ट्राच्या इतिहासात ना कधी झाला आणि पुन्हा होणेही नाही.

पाच पातशाह्यांना नेस्तनाबूत करून छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. हिंदवी स्वराज्याची पताका डौलत ठेवण्याची आणि स्वराज्याचे सर्वार्थाने रक्षण करण्याचे महत्कार्य छत्रपती शिवाजी महाराजांनंतर संभाजी महाराजांनी केले. म्हणूनच त्यांच्या नावापुढे 'स्वराज्यरक्षक' ही उपाधी लावली जाते. मध्यंतरी 'स्वराज्यरक्षक संभाजी महाराज' या मालिकेतून छत्रपती संभाजी महाराजांचा भीमपराक्रम जनतेसमोर आणला गेला; मात्र पुढे या मालिकेनेही इतिहासाची मोडतोड केल्याचा आरोप निर्मात्यांवर करण्यात आला.

संभाजी महाराजांविषयी इतिहासकारांनी लिहिलेल्या उलट सुलट बाबींमुळे महाराजांविषयीचा खरा इतिहास सर्वसामान्य लोकांपर्यंत आजतागायत कधी पोहोचलाच नाही. महाराजांच्या सडेतोड वृत्तीमुळे म्हणा किंवा कर्म धर्म संयोगाने म्हणा, महाराजांचे अहित पाहणारे लोक दुर्दैवाने स्वराज्यातच निर्माण झाले होते. या सर्वांना छत्रपती संभाजी महाराज मात्र पुरून उरले. ज्या महाभागांनी स्वराज्याचे खाऊन स्वराज्याशी बेईमानी केली त्यांच्याच पुढच्या पिढीच्या काही लोकांनी इतिहासकार बनून संभाजी महाराजांविषयी खोटेनाटे लिहून महाराजांना बदनाम करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला.

परिणामी एका असामान्य योध्याचा महत्पराक्रम अनेक पिढ्यांपासून झाकोळला गेला. ज्यामुळे आजपर्यंतच्या शालेय अभ्यासक्रमातही संभाजी महाराजांचा इतिहास थोडक्यातच आटोपण्यात आला आहे. देशाच्या भावी पिढीलाही या पराक्रमी योध्याच्या सर्वगुणसंपन्नतेची ओळख व्हावी यासाठी शालेय अभ्यासक्रमात संभाजी महाराजांचा सत्य इतिहास सविस्तरपणे शिकवण्यात यावा.

## गुढीपाडवा : मराठी नव्हे, हिंदू नववर्षारंभदिन !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

हिंदू वर्षातील पहिला दिवस आणि पहिला सण म्हणजे गुढीपाडवा ! वर्षातील साडेतीन मुहूर्तांपैकी पहिला मुहूर्त म्हणजे गुढीपाडवा ! या दिवशी कोणतेही शुभकार्य बिनदिक्कतपणे करावे, त्यासाठी मुहूर्त पाहण्याची आवश्यकता नाही. गुढीपाडवा हाच वसंत ऋतूच्या आगमनाचा दिवस. झाडांना नवीन पालवी फुटू लागते, निसर्ग बहरू लागतो. सर्व ऋतूंत 'कुसुमाकरी वसंत ऋतू ही माझी विभूती आहे', असे भगवंतांनी श्रीमद्भगवद्गीतेत (१०:३५) म्हटले आहे. 'द्वादशमासैः संवत्सरः ।' असे वेदात म्हटले आहे. वेदांनी सांगितले म्हणून ते जगाने मान्य केले. त्यामुळे गुढीपाडवा हाच खरा नववर्षारंभ. श्रीरामांनी वालीचा वध केला तो दिवस गुढीपाडव्याचा होता. शकांनी हुणांचा पराभव केला तो दिवस गुढीपाडव्याचा होता त्यामुळे याच दिवसापासून शालिवाहन शके कालगणना सुरु झाली. हा सण महाराष्ट्रात उत्साहाने साजरा होत असल्याने तो केवळ मराठी वर्षारंभ असल्याचा गैरसमज रूढ झाला आहे. रावणवधानंतर श्रीराम अयोध्येत परतले तो दिवस पाडव्याचा होता. या दिवशी सर्वांनी गुढ्या उभारून प्रभू श्रीरामांचे स्वागत केले. ब्रह्मदेवाने सृष्टीची निर्मिती केली आणि सत्ययुगाला सुरुवात झाली तोही दिवस पाडव्याचाच होता. त्यामुळे या दिवसाला सृष्टीचा आरंभ दिवस असेही म्हटले जाते. याचे संदर्भ आपल्याला वेद-पुराणात आढळतात. गुढीपाडवा हाच नववर्षारंभ असण्यामागे नैसर्गिक, ऐतिहासिक आणि आध्यात्मिक कारणे आहेत. हल्ली गुढीपाडव्यानिमित्त रस्त्यावर ठिकठिकाणी शुभेच्छा देणारे बॅनर्स आणि होर्डिंग्स पाहायला मिळतात. सध्याचे युग हे सामाजिक माध्यमांचे युग असल्याने पाडव्यानिमित्त शुभेच्छा देणारे विविध संदेश या दिवसांत सामाजिक माध्यमांतून फिरताना पाहायला मिळतात. या सर्वांतून अनेकदा गुढीपाडव्याला मराठी वर्षारंभदिन असे संबोधले जाते. गुढीपाडव्याचे महत्व आणि या दिवसाची व्यापकता पाहता या सणाला केवळ मराठीचे लेबल लावणे म्हणजे त्या सणाला संकुचित करण्यासारखे आहे. त्यामुळे गुढीपाडव्याचे वैश्विक महत्व लक्षात घेऊन त्याचा हिंदू नववर्षारंभदिन असा उल्लेख सर्वत्र करणे इष्ट ठरेल.


## स्तुत्य उपक्रम !

**विश्वनाथ पंडित
ठाणे**

वीस रुपयांच्या पाण्याच्या बाटलीचे पन्नास रुपये सुरक्षा ठेव, रिकामी बाटली परत केल्यानंतर सुरक्षा ठेव परत ही अभिनव कल्पना, एक चांगला अनुकरणीय नियम, उपक्रम असून भुवनेश्वरच्या नंदन कानन प्राणीशास्त्र उद्यानात लागू केल्याने अनेक किलोमटर पसरलेल्या नंदन कानून मध्ये प्लास्टिकची बाटली किंवा कचरा दिसत नाही. विशेषता आपल्या गडकिल्ल्यांवर, तीर्थक्षेत्री, आणि पर्यटन स्थळांबाबत अशी योजना सुरू करणेही जरूरीचे आहे नव्हे असे नियम, उपक्रम व्हायला हवेत, शिवाय कठोर अंमलबजावणी होणे ही काळाची आणि प्लास्टिक जमान्याची गरज आहे.





## कलांगण



**कु. विशाखा पवार
पोवार इंटरनॅशनल स्कूल
नांदेड सिटी पुणे
इयत्ता- सहावी**





**ग्रंथाली गुरुदास सातारकर
IMCOM 2nd year
GOA**